# स्वप्नपूर्तीसाठी पाठपुरावा महत्त्वाचा

## आयआयएम पदवी प्रदान सोहोळ्यात किशोर बियाणी यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी, नागपूर

**ज्ञान आणि** शिक्षणाच्या जगातून बाहेर पडल्यानंतर मोठ्या स्वप्नांचा आणि त्यांच्या पूर्तीचा पाठपुरावा करावा लागेल. एक व्यक्ती म्हणून कल्पनाशक्ती, मोठी स्वप्ने आणि मोठ्या परिणामांची अपेक्षा सर्वांनाच असते आणि हे सर्व तुमच्या वर्तनातून तुम्ही मिळवू शकता, असे प्रतिपादन फ्युचर समूहाचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि संस्थापक किशोर बियाणी यांनी केले.

इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंटच्या तिसऱ्या तुकडीचा पदवीप्रदान सोहोळा (२०१७-१९) सिव्हिल लाईन्स येथील चिटणवीस केंद्रात पार पडला. या सोहोळ्यात ५५ विद्यार्थ्यांनी व्यवस्थापन विषयात पदव्युत्तर पदवी घेतली. आयआयएम नागपूर संचालक मंडळाचे अध्यक्ष व टेक महेंद्राचे मुख्य कार्यकारी अधिकारी सी.पी. गुरनानी यांनी सर्वांचे स्वागत केले.



सुवर्णपदक विजेता वैभव गुप्ता याला सन्मानित करताना सी.पी. गुरनानी, किशोर बियाणी, प्रा. एल.एस. मूर्ती.

आपल्याला हवे असलेले परिणाम आपण काय करतो, कसे करतो यावर अवलंबून असतात. त्यासाठी पुस्तकातून वर्तणूक शिकवली जात नाही, तर ती पूर्णपणे तुमच्यावर अवलंबून आहे, असे किशोर बियाणी म्हणाले. माणसाच्या मनात दर मिनिटाला डझनभर विचार येतात आणि आपली सर्वात मोठी कमतरता म्हणजे यातील बहुतांश विचार हे नकारात्मक असतात. ते सकारात्मकतेत बदलण्याचे ज्यांना साध्य झाले त्यावर खरे यश अवलंबून असते, असेही ते म्हणाले.

मंडळाचे संचालक प्रा. एल.एस. मूर्ती यांनी मंडळाची पुनर्रचना, विद्यार्थ्यांच्या उपलब्धतेत वाढ, नवनवीन अभ्यासक्रमांचा परिचय याविषयी माहिती दिली. उद्योजकता केंद्र आणि उद्योजकता विकासासाठी आयआयएमचा पाया रचला गेल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी त्यांनी क्रिकेटमधील सचिन तेंडुलकरचे उदाहरण दिले. सचिनमधील खेळाडू वृत्ती आणि समूह बांधणीचा परिचय त्यांनी करून दिला. विश्वास आणि नात्यावर दीर्घ करिअर अवलंबून असते असे सांगतानाच, मूर्ती यांनी आशियातील उद्योगांच्या विकासावर लक्ष केंद्रित करा, असा सल्ला विद्यार्थ्यांना दिला. उपस्थित पाहुण्यांच्या हस्ते सुमारे ५० विद्यार्थ्यांना पदव्युत्तर पदवी प्रदान करण्यात आली, तर पाच विद्यार्थी यावेळी अनुपस्थित होते.

### वैभव गुप्ता, यश ठाकूरला सुवर्ण पदक

इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंटचे सुवर्णपदक उत्कृष्ट कामगिरीकरिता वैभव गुप्ता याला देण्यात आले. तर उत्कृष्ट परिपूर्ण कामगिरीकरिता यश ठाकूर याला सुवर्णपदक देण्यात आले.

लोकसत्ता Tue, 16 April 2019
https://epaper.loksatta.com/c/38561443